**रे.दि.मु.नं.१३४/२०१७ मधील नि.०८ वरील आदेश**
**सी.एन.आर.नं.एमएचएसटी१६०००८६७२०१७**
**(घोषित दि.०५/१०/२०१९)**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश २६ नियम ९ नुसार दावा मिळकतीची पाहणी करून अहवाल दाखल करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक व्हावी यासाठी दाखल केलेला आहे.

२) वादी यांचे कथन असे की, त्यांनी प्रस्तूतचा दावा हा प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा रस्ता तयार करू नये यासाठी निरंतरची ताकीद मिळावी म्हणून दाखल केलेला आहे. वादींचे असे म्हणणे आहे की, दावा मिळकतीमध्ये त्यांनी घर, गोठा तसेच संडास बांधलेले आहे. घराच्या समोर मोकळी जागा असून उर्वरित मोकळया जागेचा वापर वादी गंज रचण्यासाठी, शेतीची अवजारे ठेवण्यासाठी तसेच बैल बांधण्यासाठी करीत आहेत. सदर वाद मिळकतीशी प्रतिवादी क्र. ३ याचा काहीही संबंध नाही. प्रतिवादी क्र. ३ याची मिळकत दावा मिळकतीच्या उत्तर बाजूस असून त्याच्या जमीनीत जाण्यासाठी प्रतिवादी क्र. ३ हा बेकायदेशीरपणे रस्ता तयार करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचाच भाग म्हणून त्याने दि. २१/०७/२०१७ रोजी बळजबरीने जे.सी.बी. मशीनच्या सहाय्याने झाडे पाडून रस्त्यासाठी जमीन सपाट करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे रस्ता करण्याचा प्रतिवादीस कोणताही अधिकार नाही. त्यामुळे दावा मिळकतीची सध्याची परिस्थिती अभिलेखावर येण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक व्हावी अशी वादींची मागणी आहे.

३) प्रतिवादी क्र. १ यांनी सदर अर्जास आक्षेप घेतलेला असून सदरच्या निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेल्या दाव्यात न्यायालयीन आयुक्त नेमणुकीची आवश्यकता नाही असे म्हणणे सादर केलेले आहे. त्यांचे पुढे असे म्हणणे आहे की, वादीने सदरचा दावा केवळ पुरावा गोळा करण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे.

४) प्रस्तुत दाव्यात वादीचे असे म्हणणे आहे की, मौजे धावडी येथील नवीन

ग्रामपंचायत मिळकत नं. २०८ क्षेत्र, ७३०० चौ. फुट ही जागा त्यांची वडीलार्जित मिळकत असून त्या जागेचा ते फार पूर्वीपासून उपभोग घेत आहेत. या जागेच्या उत्तरेस प्रतिवादी क्र. ३ यांची शेतजमीन असून त्याला त्याच्या शेतजमीनीत जाण्यासाठी जवळचा रस्ता मिळावा म्हणून तो घुसखोरी करून दावा मिळकतीमधून रस्ता तयार करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादीने या दाव्यात केवळ प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्याविरूध्द निरंतरच्या मनाई हुकुमाची मागणी केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ व २ हे मौजे धावडी ग्रामपंचायतीचे अनुक्रमे ग्रामसेवक व सरपंच आहेत. त्यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले असे वादीचे म्हणणे नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. ३ याने दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले असे वादीचे कथन नाही. त्याचप्रमाणे दावा मिळकतीच्या हद्दीबाबत वाद उत्पन्न झालेला नाही. केवळ प्रतिवादी क्र. ३ हा दावा मिळकतीमधून बेकायदेशीरपणे रस्ता तयार करण्याचा प्रयत्न करीत आहे असे वादीचे म्हणणे आहे. दावा मिळकतीमधून रस्ता आहे अथवा नाही याबाबत वादी आणि प्रतिवादी क्र. ३ यांनी पुरावा सादर करणे आवश्यक आहे. जर रस्ता अस्तित्वात असेल तर तशा प्रकारचा तोंडी व कागदोपत्री पुरावा प्रतिवादी क्र. ३ न्यायपटलावर सादर करेल. अशा परिस्थितीत जर दावा मिळकतीची पाहणी करण्यासाठी व तसा अहवाल मागविण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक केली तर त्यांच्यामार्फत पुरावा गोळा केल्यासारखे होईल. त्यामुळे प्रस्तूत प्रकरणात न्यायालयीन आयुक्त यांच्यामार्फत दावा मिळकतीची पाहणी करून तशा प्रकारचा अहवाल मागविणेची आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, दाव्यातील कथनाचा व मागणीचा विचार करता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## <u>आदेश</u>

सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत येत आहे.

( डी.आर.माळी. )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
वाई.

दि.०५/१०/२०१९